काळोखावरही प्रेम करावे
हे जेव्हा आपल्याला कळते
काळोखाचे भय मनांतले
दूरवर भिऊनच पळते.

काळोखावरच प्रेम करतो
तेव्हा काळोखही कळत जातो.
पोटात दडलेले सारे विश्व
ते उघड करून दाखवतो.

तिथे आहे भीती, भयानकता
कल्पक भराऱ्यांतील दाहकता
मानवी डोळयांची मर्यादा, पण,
ही काळोखाची निर्मिती नसते.

प्रकाशाच्यापरि काळोखाचे अस्तित्व
प्रकाशमान होते आपल्या मनांत
जेव्हा काळोखावर प्रेम करतो
काळोख  आपला सोयरा होतो!

२१.१.२०१९